*Let the mind manage the body*
*Que l'esprit gère le corps*

# MARATHI

(Subject code No. P190)

**Index Number:** ..........................................................................................

# MAURITIUS EXAMINATIONS SYNDICATE

## Primary School Achievement Certificate Assessment 2024

**Time: 1 hour 45 minutes** **Total Marks: 100**

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Check that this assessment booklet contains **9** questions printed on **17** pages.
2. Write your Index Number on the assessment booklet in the space provided above.
3. You should not use red, green or black ink in answering questions.
4. Write all your answers clearly in the assessment booklet.
5. Attempt **all** questions.

| Question | Marking | | | Revision | | | Control | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Marks | | Sig | Marks | | Sig | Marks | | Sig |
| 1A | | | | | | | | | |
| 1B | | | | | | | | | |
| 2A | | | | | | | | | |
| 2B | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4A | | | | | | | | | |
| 4B | | | | | | | | | |
| 5A | | | | | | | | | |
| 5B | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7A | | | | | | | | | |
| 7B | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | |
| **Sig (HoG)** | | | | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

Marks

**Question 1A (5 marks)**
**चित्र ओळखा आणि नाव लिहा. एक उदाहरण दिलेले आहे.**



मेज
______________________



______________________



______________________



______________________



______________________



______________________

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over this page

Marks

**Question 1B (5 marks)**

**योग्य वाक्य आणि चित्र जुळवा. एक उदाहरण दिलेले आहे.**

झाडावर फळे आहेत.

मुली खेळत आहेत.

माझी बहीण पुस्तक वाचत आहे.

अनिल पाव खात आहे.

माझे बाबा बाजारात आहेत.

कुत्रा रस्त्यावर चालतो.













| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 2A (10 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा. एक उदाहरण दिलेले आहे.**

**उदाहरणः** रोज सकाळी माझे बाबा लवकर _________.

अ. उठतो　　　(ब.) उठतात

क. उठते　　　ड. उठता

१. आई _________ दादा घराची साफसफाई करतात.

अ. पासून　　　ब. आणि

क. म्हणून　　　ड. पण

२. माझी मैत्रीण _________ कपडे घालते.

अ. नवा　　　ब. नवी

क. नवे　　　ड. नव्या

३. काल अभयने एक छानशी कथा _________ .

अ. वाचली　　　ब. वाचते

क. वाचेल　　　ड. वाचशील

४. सर्व मुले वर्गात राहिली _________ हवामान बिघडलेले आहे.

अ. कारण　　　ब. किंवा

क. तेव्हा　　　ड. अथवा

५. बाबांनी विचारले, “ तुला _________ पैसे दिले?”

अ. काय　　　ब. कोणी

क. कोण　　　ड. कशी

Marks

६. त्या फुलझाडावर अनेक फुलपाखरे ________ .

अ. उडतो ब. उडाला

क. उडेल ड. उडतात

७. _________ शाळेची इमारत मोठी आहे.

अ. आमची ब. आमच्या

क. आमचे ड. आमचा

८. _________ गरमागरम पुरणपोळी तयार केली.

अ. आजीला ब. आजीशी

क. आजी ड. आजीने

९. जेव्हा सूर्य उगवतो _________ सर्वजण उठतात.

अ. जर ब. परंतु

क. तेव्हा ड. शिवाय

१०. संजयने _________ दोन पाव आणले.

अ. दुकानाची ब. दुकानाच्या

क. दुकानाचा ड. दुकानातून

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 2B (5 marks)**

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. माझी बहीण जखमी झाली. ती _________ आहे.

अ. रडत　　ब. वाचत

क. लिहीत　　ड. खात

२. _________ घे. पाऊस पडत आहे.

अ. पेन　　ब. चमचा

क. छत्री　　ड. पुस्तक

३. मी परीक्षेत पास झालो, मला _________ वाटत आहे.

अ. आनंद　　ब. आळस

क. राग　　ड. भूक

४. माझा भाऊ आजारी आहे. तो _________ जात आहे.

अ. पोलिसाकडे　　ब. डॉक्टरकडे

क. शिक्षकाकडे　　ड. माळ्याकडे

५. सुट्टीत आम्ही मराठी चित्रपट _________ .

अ. धावतो　　ब. धुतो

क. शिजवतो　　ड. पाहतो

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

## Question 3 (10 marks)

**खालील पोस्टर वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**शामुनी सरकारी शाळा**
**कथालेखन स्पर्धा**

**शामुनी सरकारी शाळा कथालेखन स्पर्धा आयोजित करीत आहे.**
**सहावीच्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेण्यास आमंत्रित केले आहे.**

ते पुढील विषयांवर लिहू शकतातः

१. माझे कुटुंब
   किंवा
२. माझे मांजर

**तारीख : सोमवारी १७ जून २०२४**
**वेळ : १० ते ११ वाजता**
**स्थळ : शाळेचा हॉल**

**पहिले बक्षीस : २००० रुपये**
**दुसरे बक्षीस : १५०० रुपये**
**तिसरे बक्षीस : १००० रुपये**

**ज्यांना भाग घेण्याची इच्छा आहे त्यांनी वर्गशिक्षिका, सौ. गोविंद यांना ३१ मे २०२४ पर्यंत आपले नाव द्यावे.**

Marks

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोणती शाळा ही स्पर्धा आयोजित करीत आहे?

______________________________ [1]

२. कोणती स्पर्धा आयोजित करीत आहे?

______________________________ [1]

३. स्पर्धेत कोणाला भाग घेता येईल?

______________________________ [1]

४. ज्यावर विद्यार्थ्यांना लिहिता येईल, असा एक विषय द्या.

______________________________ [1]

५. कोणत्या तारखेला स्पर्धा असेल?

______________________________ [1]

६. स्पर्धा किती वाजता सुरू होईल?

______________________________ [1]

७. स्पर्धा कोठे असणार?

______________________________ [1]

८. पहिले बक्षीस म्हणून काय मिळेल?

______________________________ [1]

९. विद्यार्थ्यांनी कोणाला आपले नाव द्यावे?

______________________________ [1]

१०. कोणत्या तारखेपर्यंत विद्यार्थ्यांनी आपले नाव द्यावे?

______________________________ [1]

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over this page

Marks

## Question 4 (15 marks)

**खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

श्री सोनू मोका गावात राहत होते. एके दिवशी त्यांनी आपल्या नोकराला दोन मोठे आंबे दिले व सांगितले, "रामू, हे दोन आंबे काप. माझा मित्र पवन येणार आहे व त्याने आंबे खावे अशी माझी इच्छा आहे."

आंबे कापल्यानंतर, रामूने एक तुकडा खाल्ला. त्याला आंबा खूप स्वादिष्ट लागला म्हणून त्याने दोन्ही आंबे खाल्ले!

एकाएकी श्री सोनूंनी त्याला बोलावले, "रामू, कृपया आंबे आण." बिचारा रामू! त्याला भीती वाटली की श्री सोनू त्याच्यावर रागावतील. तो काय करेल?
अचानक, त्याला एक युक्ती सुचली. "अहो सोनूजी, सुरी खूप लहान आहे. मला या सुरीने आंबे कापता येत नाहीत."

"थांब! मी सैपाकघरातून एक मोठी सुरी आणून तुला देतो." श्री सोनूंनी म्हटले.

त्याच वेळेस श्री सोनूंचा मित्र, पवनला येताना रामूने पाहिले. रामूला उत्तम युक्ती सुचली व तो म्हणाला, "सर, श्री सोनू तुमच्यावर खूप रागावलेले आहेत. ते सुरी घेऊन तुमची वाट पाहत आहेत."

बिचारा पवन! त्याने विचार केला, "काल जेव्हा तो माझ्याकडे आला तेव्हा मी चुकीने त्याचे बूट घातले. मला माहीत नव्हते की तो रागावेल. पोलिसाला बोलावण्यापूर्वी मला इथून पळून जावे लागेल."

नंतर रामू श्री सोनूजवळ गेला. "मालक, श्री पवन दोन्ही आंबे घेऊन पळून गेले!"
श्री सोनू बाहेर आले व त्यांनी आपल्या मित्राला पळून जाताना पाहिले. "थांब!" ते ओरडले. पवनने मागे पाहिले. त्याला दिसले की श्री सोनू हातात मोठी सुरी घेऊन त्याच्यामागे धावत होते. तो मोठ्याने ओरडला व वेगाने पळून गेला.

श्री सोनू घरी परत गेले व रामूला म्हणाले, "मला माहीत नव्हते की माझा मित्र पवन चोर होता!"

Marks

## Question 4A (5 marks)

**खाली दिलेल्या उत्तरांपैकी योग्य उत्तराच्या वर्णाभोवती वर्तुळ काढा.**

१. पवनने आंबे ________________ अशी श्री सोनूंची इच्छा होती.

अ. खावे

ब. कापेल

क. लपवेल

ड. टाकेल

२. आंबे खाल्ल्यावर, रामूला भीती वाटली कारण ________________ .

अ. श्री सोनूंकडे सुरी होती.

ब. पवनला भूक लागली होती.

क. पवन येत होता.

ड. श्री सोनू रागावतील.

३. सुरी घेण्यासाठी श्री सोनू ________________ गेले.

अ. खोलीत

ब. सैपाकघरात

क. शहरात

ड. गावात

४. पवन पळून गेला कारण ________________ .

अ. रामूला भीती वाटली.

ब. रामू आंबे कापत होता.

क. श्री सोनूंच्या हातात सुरी होती.

ड. श्री सोनूंनी त्याचे बूट घातले.

५. रामू खूप ________________ आहे.

अ. हुशार

ब. दयाळू

क. प्रामाणिक

ड. शांत

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over this page

Marks

**Question 4B (10 marks)**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. श्री सोनू कोणत्या गावात राहत होते?

______________________________ [1]

२. रामूने आंबे कापावे अशी श्री सोनूंची इच्छा का होती?

______________________________ [1]

३. रामूला आंबे कसे वाटले?

______________________________ [1]

४. रामूने श्री सोनूला सांगितले की त्याला आंबे कापता येत नव्हते.

(i) त्याने कोणते कारण दिले?

______________________________ [1]

(ii) श्री सोनूंनी कशी मदत करण्यास सुचवले?

______________________________ [1]

५. पवनला का वाटले की श्री सोनू त्याच्यावर रागावले?

______________________________ [1]

६. शेवटी श्री सोनू यांना पवनबद्दल काय वाटले?

______________________________ [1]

Marks

**७. पुढील वाक्ये उताऱ्यानुसार योग्य क्रमात लिहा. पहिले वाक्य देण्यात आले.**

| | |
|---|---|
| • रामूला भीती वाटली. | |
| • रामूने श्री सोनूंना म्हटले की पवन पळून जात आहे. | |
| • रामूने दोन्ही आंबे खाल्ले. | १ |
| • रामूने पवनला येताना पाहिले. | |

M R HG QC CE

[3]

**Question 5A (4 marks)**

**वाक्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.**

**(अ) खालील शब्द योग्य क्रमाने लिहून वाक्ये लिहा.**

१. अनेक – विकतो – भाज्या – ताज्या – भाजीवाला

___

___

२. दिले – आजोबांनी – रुपये – काल – पन्नास – अमितला

___

___

M R HG QC CE

Marks

**Question 5B (6 marks)**

**(ब) खाली दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करा.**

१. राजीव आपल्या मित्रांबरोबर ______________________________

______________________________________________________

२. जेव्हा आजी आमच्याकडे आली तेव्हा ______________________________

______________________________________________________

३. काल संजनाला ताप आला म्हणून ______________________________

______________________________________________________

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 6 (10 marks)**

**खालील गोष्ट वाचून मोकळ्या जागी योग्य शब्द भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नंतर** | **गोष्ट** | **घंटा** | **माझ्या** | **खेळतात** |
| **शिक्षिका** | **पहिला** | **ऐकतो** | **नऊ** | **सुंदर** |

माझे नाव अरुणा आहे व मी पाच वर्षांची आहे. आज माझ्या शाळेचा _________ दिवस आहे. शाळेत एक _________ बाग आहे. मुले तिकडे _________ . एक शिक्षिका मला घेऊन _________ वर्गात नेते. _________ वाजता शाळेची _________ वाजते. वर्ग सुरू करण्याची वेळ आहे.

_________ आम्हाला नवी पुस्तके देते. ती आम्हाला एक छानशी _________ सांगते व आम्ही लक्षपूर्वक _________ . जेवणा_________ आम्ही घरी जातो. आम्ही खूप खुश आहोत.

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over this page

Marks

**Question 7A (5 marks)**

**खाली दिलेल्या वाक्यात काही चुकीचे शब्द अधोरेखित आहेत. कंसातील मोकळ्या जागी त्या शब्दाचे योग्य रूप लिहा.**

१. मावशीने ताईची चोळी **शिवला**. (__________)

२. एक हिरवा पोपट **झाडखाली** बसला होता. (__________)

३. माळी **बाग** फुलझाडे लावतो. (__________)

४. माझ्या **आजोबाला** गरम चहा आवडतो. (__________)

५. **सायंकाळ** सूर्य मावळतो. (__________)

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

**Question 7B (5 marks)**

**कंसातील शब्दांचे योग्य रूप लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१. माझी शेजारीण खूप (प्रेम) ___________ आहे.

२. मांजराने ताजे (मासा) ___________ खाल्ले.

३. ताईला (रस) ___________ फळे आवडतात.

४. सिंह एक (रान) ___________ जनावर आहे.

५. प्रिया (सुवास) ___________ फुलांची माळ गुंफते.

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |

Marks

**Question 8 (10 marks)**

**खाली दिलेल्या प्रत्येक चित्रावर एक वाक्य लिहून गोष्ट लिहा. तुम्हाला दिलेल्या शब्दांचाच वापर करावा.**



सकाळी – उठणे

______________________________

______________________________



नंतर – दात घासणे

______________________________

______________________________



सैपाकघर – खाणे

______________________________

______________________________



लवकर – तयार होणे

______________________________

______________________________



शेवटी – निघणे

______________________________

______________________________

| |
|---|
| M |
| R |
| HG |
| QC |
| CE |



Please turn over this page

Marks

**Question 9 (10 marks)**

**दिलेल्या मुद्यांच्या आधारे सुमारे १०० शब्दांचा एक निबंध लिहा.**

- शाळेच्या सहलीला जाणे.
- उशिराने शाळेत पोहोचणे. का?
- बस निघून जाणे.
- शेवटी काय होणे?

M

R

HG

QC

CE

Marks

| M |
|---|
| R |
| HG |
| QC |
| CE |